महाराष्ट्र शासन
• वन विभाग •

दुरध्वनी क्रमांक : 02527/272096
फॅक्स क्रमांक : 02527/272096
ईमेल : dcfshahapur@gmail.com,
dycfshahapur@mahaforest.gov.in

# उप वनसंरक्षक, शहापूर वनविभाग, शहापूर यांचे कार्यालय

शहापूर-आसनगांव रोड, जूना आग्रारोड, आसनगांव, मु.पो.ता. शहापूर, जि. ठाणे 421 601

क्रमांक - कक्ष-13(3)/20/जमीन/ 90 /2022-23 दिनांक 3 / 04 / 2023

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रा.)
ठाणे

विषय:- वनजमिन ठाणे
कल्याण ते कसारा दरम्यान रेल्वे लाईन करिता ठाणे जिल्हयातील 16.6846 हे.आर. वनजमीन वळती करण्याबाबत

संदर्भ:-
1. अवर सचिव, (फ-10), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. एफएलडी-1923/प्र.क्र.20/फ-10, दिनांक 8/2/2023
2. आपले कार्यालयाकडील पत्र क्रमांक कक्ष-10/वसं/प्र.क्र.67/16-17/जा.621, दिनांक 14/2/2023
3. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-13(3)/20/जमीन/1642, दिनांक 8/3/2023
4. आपले कार्यालयाकडील पत्र क्रमांक कक्ष-10/वसं/प्र.क्र.67/16-17/जा.680, दिनांक 10/3/2023
5. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म. रा. नागपूर यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-17/नोडल/ठाणे/आयडी-13361(78)/3419, दिनांक 14/3/2023
6. आपले कार्यालयाकडील पत्र क्रमांक कक्ष-10/वसं/प्र.क्र.67/16-17/जा.695, दिनांक 27/3/2023

विषयांकित प्रकरणी उपरोक्त सदर्भान्वये कल्याण ते कसारा दरम्यान रेल्वे लाईन करिता ठाणे जिल्हयातील 16.6846 हे.आर. वनजमीन वळती करणेचे प्रस्तावाचे अनुषंगाने संदर्भ क्रमांक 1 अन्वये उपस्थित केलेल्या मुद्दयांचा त्रुटी पूर्तता अहवाल आपले कार्यालयाकडे संदर्भ क्रमांक 3 अन्वये सादर करण्यांत आलेला होता. सदरचा अहवाल आपले कार्यालयाकडून संदर्भ क्रमांक 4 अन्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म. रा. नागपूर यांचे कार्यालयास सादर करण्यांत आलेला आहे. तथापी सदर अहवालात प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म. रा. नागपूर यांनी संदर्भ क्रमांक 5 अन्वये त्रुटी उपस्थित केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने सदर त्रुटी पूर्तता अहवाल सादर करणेकामी या कार्यालयास संदर्भ क्रमांक 6 अन्वये कळविण्यांत आलेले आहे.

त्या अनुषंगाने मुद्देनिहाय या विभागाचा पूर्तता अहवाल सादर करण्यांत येत आहे.

1. प्रकल्प यंत्रणेने उपवनसंरक्षक, वन्यजीव विभाग ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर केल्याचे दिनांक 16/12/2022 रोजीचे पत्र व उपवनसंरक्षक, वन्यजीव विभाग ठाणे यांनी अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मुंबई यांचेकडे सदरचा प्रस्ताव सादर केलेल्या दिनांक 20/12/2021 रोजीचे पत्राची छायांकीत प्रत या सोबत सादर करण्यांत येत आहे.



Scanned with OKEN Scanner

2. पर्यायी वनिकरणा करिता प्रस्तावित केलेल्या मौजे ठिळे येथील कं.नं. 849 राखवी वन गट नंबर 173 समाविष्ट सर्व्हे क्रमांक 101 व संरक्षित वन 174 समाविष्ट सर्व्हे क्रमांक 100 ची योजना तयार करुन या सोबत सादर करण्यांत येत आहे.

3. प्रकरणी संदर्भ क्रमांक 1 अन्वये अवर सचिव, (फ-10), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून पर्यायी वनिकरणासाठी साठी प्रस्तावित केलेल्या जागेबाबत त्रुटी पूर्तता उपस्थित करण्यांत आलेल्या होत्या. त्या अनुषंगाने पूर्वी प्रस्तावित केलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त लगतचे क्षेत्र मौजे ठिळे येथे नव्याने प्रस्तावित करण्यांत येवुन, सदर क्षेत्राची सहा.वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा), शहापूर यांनी प्रत्यक्ष पहाणी करुन, सदरचे क्षेत्र लागवडीस योग्य असल्याचे नमूद करुन, तशा स्वरुपाचे वनक्षेत्रपाल शहापूर व सहा.वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा), शहापूर यांनी प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केलेले आहे. त्या अनुषंगाने सदरचे क्षेत्राचे Colour Geotag Photo फोटो व पर्यायी वनिकरणासाठी योग्य असल्याबाबत प्रमाणपत्र संदर्भ क्रमांक 3 अन्वये आपले कार्यालयास सादर करण्यांत आलेले आहे.

तथापी संदर्भ क्रमांक 5 अन्वये पर्यायी वनिकरणासाठी प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र वृक्षाच्छादित असल्याबाबत त्रुटी उपस्थित केलेली आहे.. त्या अनुषंगाने नमूद करण्यांत येते की, सदया नव्याने पर्यायी वनिकरणासाठी प्रस्तावित करण्यांत आलेले वनक्षेत्राची 0.3 घनता असून, सदर क्षेत्राची जमीनीच्या मातीची खोली सुमारे 2 फूटच्या आसपास आहे.. सदरचे क्षेत्र वनिकरणासाठी योग्य आहे. तशा स्वरुपाचे उपवनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र यासोबत सादर करण्यांत येत आहे. सदर क्षेत्रामध्ये तुरळक स्वरुपाचा झाडोरा आहे. परंतू वृक्ष लागवडीकामी सदरच्या तुरळक झाडो-याचा अडथळा निर्माण होणार नाही. तसेच प्रस्तावित ठिकाणी 15 हेक्टर इतके निव्वळ पर्यायी वनीकरण घेणे अपेक्षित असून सदर ठिकाणी असणारे तुरळक झाडो-याचे क्षेत्र गृहित धरुन त्याऐवजी 16.3 हेक्टर इतके एकूण एकंदरीत क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी निवडण्यात आले आहे.

शहापूर वनविभागाचे क्षेत्रामधील झाडोरा विरहीत क्षेत्राची पाहणी केली असता, मुख्यता अशा क्षेत्रातील जमीन ही एकतर खडकाळ किंवा मुरमाड/रोपवन लागवडी योग्य नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे उपरोल्लेखित लागवडी योग्य जमीन असलेल्या क्षेत्राची निवड पर्यायी वनीकरणासाठी करण्यात आली आहे. तरी नव्याने प्रस्तावित करण्यांत आलेले मौजे ठिळे येथील कं.नं. 849 राखवी वन गट नंबर 173 समाविष्ट सर्व्हे क्रमांक 101 व संरक्षित वन 174 समाविष्ट सर्व्हे क्रमांक 100 चे क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी स्विकृत होणेस विनंती आहे. सदर पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या क्षेत्राचे Colour Geotag Photo या सोबत सादर करण्यां येत आहेत.

4. पर्यायी वनिकरणासाठी प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र पर्यायी वनिकरणासाठी योग्य असल्याबाबत खालील स्वाक्षरीकर्ते यांचे प्रमाणपत्र संदर्भ क्रमांक 3 अन्वये यापूर्वी सादर करण्यांत आलेले आहे.

सहपत्र:- वरीलप्रमाणे

(सचिन रेपाळ)
उप वनसंरक्षक
शहापूर वनविभाग, शहापूर

प्रतिलिपी:- उप मुख्य अभियंता (बांधकाम), मध्य रेल्वे रिझरवेशन ऑफिसच्या पाठीमागे, जवाहर मार्ग, घाटकोपर (प), मुंबई - 77 यांचेकडे माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

-

-

F:\Mandar\NEW PC\Land\Kalyan Kasara Railway 3rd Line\Letter.docx

Scanned with OKEN Scanner